REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# आंबेडकरवादी कवितेतील वैचारिकता


**प्रा.डॉ.काकासाहेब रामराव सुरवसे**
मराठी विभागप्रमुख , बी.एस.एस.कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय माकणी ता.लोहारा ता. उस्मानाबाद.

## प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने मराठी वाडमयामध्ये 1960 नंतर जो आंबेडकरवादी मराठी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. यालाच प्रस्थापित समीक्षकानी दलित साहित्य असे संबोधले गेले. फुले आंबेडकर यांच्या वैचारिक आणि सामाजिक क्रांती विज्ञानातून बीजरुप घेऊन मूल्याधिष्ठीत जीवनाचा, समतेचा, मानवतेचा, बंधुत्वाचा झरा वाहताना दिसून येतो. माणसाला माणूस म्हणून जगण्याचे सर्व न्याय हक्क मिळायला पाहिजेत याची प्रामुख्याने जाणीव व्यक्त होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांया उतुंग कार्याचे आणि वैचारिकतेचे अधिष्ठान या साहित्याचा गाभा आहे. वैचारिक प्रबोधनाबरोबरच वंचित बहुजन समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे व दुःखाचे चित्रण मोठया प्रमाणात केले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील विविध स्तर शिक्षणाने जागृत झाले. वैचारिक परिवर्तनांचा प्रचंड ओघ निर्माण झाला. मराठी कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीदर्शी तत्वज्ञानातून जन्मास आली असून तिचा पिंडच वैचारिकतेचा आहे.

कवी नामदेव ढसाळ यांच्या कवितेतन व्यक्त होणारी वैचारिकता ही संपूर्ण मानवी समाजाच्या उन्तीचा विश्वव्यापी विचार मांडते. मानवी दुःखाला, वेदनेला, अन्यायाला, अत्याचाराला, वाचा फोडणारी कविता आहे. न्यायासाठी झगडत आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेला, मानवतेला आवाहन करते आहे. त्यांच्या कवितेतून प्रकट होनारा विद्रोह हा मानवाला जगण्याचे मूल्य प्राप्त करून देतो. माणूसकीचा साक्षात्कार घडवणारी ढसाळांची कविता वैचारिक दृष्टया महत्वाची ठरते. नामदेव ढसाळ म्हणतात,

'माणसाने पहिल्या प्रथम स्वतःला
पूर्ण अंगाने उद्ध्वस्त करून घ्यावे
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये.
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी
मानून त्यांच्या कुषीत गुण्यागोविंदाने रहावं
एक तीळ सर्वांनी खरडून खावा
माणसावरच सुक्त रचावे,
माणसाचे गाणे गावे माणसाने''[1]




मानवाने सर्व प्रथम स्वतःला पूर्ण उद्ध्वस्त करून घ्यावे आणि मग पहिल्यापासून मानवी मूल्यांचा शोध घ्यावा जुनी कालबाहय टाकावू बुरसटलेली मूल्य नाहीशी करावी. नवीन जवीन मूल्य ही लोकशाही जीवन प्रणाली स्वीकारणारी असावी जेणे करून माणसाने माणसाशी समानतेने वागावे कोणी कोणालाही गुलाम करू नये बंधुत्वाच्या नात्याने एकमेकांशी व्यवहार करावा. आभाळाला आजोबा आणि जमीनीला आजी मानून सर्वांनी गुण्यागोविंदाने आनंदानी जीवन जगावे माणसाचीच गाणी गावीमाणसाने असा मूल्यात्मक विचार

त्यांची कविता मांडते त्यांनी खास उपरोधिक शैलीचाही उपयोग केला आहे. यासंदर्भात प्रा.भालचंद्र फडके म्हणतात, ''ढसाळांची कविता ही प्रचंड भोगलेली असंख्य दु:खाच्या जखमा निःसंकोच बाळगून आज ती प्रस्थापित समाजाला उलथवून टाकण्याच्या पावित्र्यात उभी आहे. त्यांच्या कवितेत प्रक्षोभ उसळून येतो. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन मानवी प्रतिष्ठेसाठी, सर्व श्रेष्ठ मूल्यांसाठी दलितांच्या साठी ढसाळानी मुक्ती लढा सुरू केला आहे.''[2]

कवी त्र्यंबळ सपकाळे हे आपल्या 'सुरूंग' या काव्यसंग्रहातील 'माणूस' या कवितेत म्हणतात, की, 'माणसातील माणूस जागवला पाहिजे आणि स्वाभिमानाने जगता आले पाहिजे त्यासाठी डॉ.आंबेडकर यांचा विचार आत्मसात करायलाच पाहिजे तरच माणसाला स्वाभिमानाने जीवन जगता येईल म्हणून कवी म्हणतो,

हे अभाग्यांनो जागवा तुमच्यातील माणूस तुम्हीच स्वतः
त्यातूनच उगवेल पहाट नवतेजाची माणसाच्या महानतेची''[3]

त्यांच्या कवितेतील वैचारिकता ही मानवी जीवनातील जीवन मूल्यांचा उदात अविष्कार प्रकट करते. नवीन पहाट उगविण्याची आशा व्यक्त करते. मानवी जीवन सर्वांगाने समृध्द व्हावे यासाठी माणसाने आपल्यातला माणूस जागृत करावा. येथे कवि माणसाच्या महानतेला अधिक महत्व देतो. ज.वि.पवार यांच्या कवितेतून प्रकटणारी वैचारिकता ही मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे. शोषित पीडित सर्वसामान्य माणसाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य कुठं मिळालं आहे आज ही दलित पीडित माणूस मानवी स्वातंत्र्य, समता बंधूता आणि न्यायासाठी अहोरात्र झगडत आहे. आयुष्याला नवे वळण देणाऱ्या महान महापूरूषांच्या प्रतिमांचा वापर करून त्यातून एक नवीन विचार देण्याचे कार्य केले आहे. म्हणून कवी म्हणतो.

' कारागृहाची भीती कुणाला
उभं आयुष्य तुरूंग समजून सहनलं
हेही बरंच झालं तुरूंगाच्या पायथ्याषी
सुरूंग पेरणे शक्य झालं''[4]

ज.वि.पवारांची कविता क्रांती प्रवण वैचारिक भाव व्यक्त करते या कवितेत पिळल्या व दबल्या गेलेल्या समाजाचा चेहरा मोहरा बदलून टाकण्याची ताकद त्यांच्या कवितेत आहे.

अर्जून डांगळे यांच्या कवितेतील वैचारिकता ही समाज मनाला चेतना देणारी आहे. प्रतिगामी शक्ती विरूध्द आक्रमक पावित्रा घेऊन लढा देण्यासाठी प्रेरणा देणारी आहे. मुर्दाड बनलेल्या समाजाला चेतना देऊन त्याला लढण्यास सज्ज करणारी आहे. कवी म्हणतो,

''आता तुझ्या मुर्दाड मनातून ठिणग्या फुलू देत.
आता तुझ्या हातातील बेडया कडाकडातूटू देत''[5]

अर्जून डांगळे यांची ही कविता माणसाच्या समूह मनाचे क्रांती गीत गाणारी आहे. माणसातील स्वाभिमान जागविणारी आहे.

तर यशवंत मनोहरांची कविता ही माणसाची प्रतिष्ठा जोपासणारी आहे. जुने विचार प्रथा–परंपरा, धर्म आणि रूढी विरूध्द आवाज बुलंद करणारी आहे. आधुनिक काळात, वर्तमानात ढोंगी माणसं थोरामोठयांचे विचार नाकारणारे खूपच वाढत चालले आहे म्हणून कवि म्हणतो,

'' तुझ्या विचाराचे काळीज नाकारणारे अलीकडे
खुपच वाढले आहेत.
पण हे तू पाहू शकला असतास तर माझी खात्री आहे.

सिध्दार्थ मी बुध्दिस्ट नाही असे व्याकुळ वैतागाने उरी फुटून तू म्हणाला असतास''[6]

मला खात्री आहे गौतम बुध्दांचे विचार अगदी तर्क निष्ठपणे आचरणात आणणारे आहेत. असा वैचारिक भाव त्यांच्या कवितेतून निर्माण होतो. मनोहरांच्या कवितेतील वैचारिकता प्रतिमा सामर्थ्याच्या बळावर प्रकटते. यासंदर्भत डॉ. सुनील चंदनशिवे म्हणतात, ' मनोहरानी वैचारिकतेला काव्यात्मकतेची जोड देऊन, चीड, त्वेष, राग, संताप व्यक्त करतात. तर स्वाभिमान अभिमान, महत्वाकांक्षा नकार भावना इ. गोष्टीत वैचारिकता दिसते..''[7]

दया पवार यांच्या कवितेतूनन अभिव्यक्त होणारी वैचारिकता ही आधुनिक वाटते ते म्हणतात.

''मी तुला पाहतो चालता बोलता
दीन दुबळयांच्या दुःखावर फुंकर घालणारा,
जीव घेण्या काळोखात हाती मशाल घेत
झोपडी झोपडीकडे जाणारा''[8]

मला पारंपारिक गौतम बुध्द दिसत नाही, तर तो मला चालता बोलता आणि विचार मंथन करणारा दिसतो. नवीन चेतनादायी परिवर्तन करणारा, नव्या पिढीला नवा विचार देणारा तूच आहेस.

प्रल्हाद चेंदवणकर आपल्या 'ऑडिट' या काव्य संग्रहातील वैचारिकता स्पष्ट करताना म्हणतात.

तु ये असा पुढे ये
तुझ्या गच्च मुठीतील हिलाल
घुमवित घुमवित ये
हा पिढयान पिढयांचा बदमाशा अंधार
लोळवित तुडवित ये''9

अन्याय अत्याचार संपविण्यासाठी तू ये आणि सर्व नष्ट कर नवीन जग निर्माण कर हा पिढयान पिढयापासून चालत असलेला अन्याय नष्ट करून नवीन मानवतेचं समतेचा जग निर्माण करण्यासाठी कवी आवाहन करतो. आपल्या कवितेतून विद्रोही भाव अचूक शब्द प्रतिमातून मार्मिकपणे रेखटला आहे, तर केशव मेश्राम यांच्या कवितेतूने अस्वस्थ मनांमध्ये अस्मिता जागृत करणारी वैचारिक क्रांती घडवून आणली आहे. घोट घोट पाणी पीत विद्रोहाची गाणी गाणारी कविता त्यांनी लिहिली आहे. मनाला अंतर्मुख करणारी व झपाटून टाकणारी भाषा व लेखन शैली शब्द प्रतिमांचा वापर, मानसिक वैशिष्टये व वैचारिकता हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे.

वामन निबांळकर यांच्या कवितेतील वैचारिकता स्पष्ट करताना आपल्या 'शब्द' या कवितेत म्हणतात शब्दांनी पेटतात घरे, दारे, देश आणि माणसे सुध्दा आणि शब्दांनीच शांत होतात. माणसे , घरे, दारे आणि देशसुध्दा शब्दांची ताकद ही प्रचंड आहे. म्हणून समाजाला जाग करण्याचं कार्य करतात.

आंबेडकरी चळवळीची बांधिलकी स्वीकारणारे आंबेडकरवादी कवी वास्तवाला प्राधान्य देतात. नरेंद्र बी. नरवाडे यांची 'लाखात एक' ही कविता आंबेडकरवादी वैचारिकता स्पष्ट करणारी आहे.

'चिखलातल्या माणसाला कमळाचे फुल केले
मार्ग मोकळे शिक्षणाचे जणू शिखरावरती नेले
नाही अंधार बहुजना तू आता ज्ञानाचा दिवा तो लाव रे'10

शिक्षणामुळे माणसाच्या जीवनात अमूलाग्र बदल घडून आला याची प्रचिती येते. अज्ञानरूपी आंधकारात, चिखलात रूतलेल्या माणसाला डॉ. बाबासाहेबांच्या कार्यामूळे योग्य दिशा मिळाली प्रज्ञा, शील, करूणेच्या ज्ञान मार्गाच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त झाला. 'भीम कैवारी' या कवितेत प्रकाश महादेव पाखरे लिहितात.

भीमाने दाखविलां आम्हाला सदधम्म
त्या भीमामुळे आम्हाला मिळाला बुध्दधम्मं

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे त्यांच्या क्रांतीकारी परिवर्तनशील विचारक्रांतीमुळेच आम्हाला सद्धम्म म्हणजेच बुध्दधम्म मिळाल्याची वैचारिक भावना व्यक्त केली आहे.

आंबेडकरवादी कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आत्मसात करून मार्गक्रमण करणारी आहे. तो विचार नवीन पिढयांमध्ये चैतन्य निर्माण करतो. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा आदर्श डोळयापूढे ठेवून वाटचाल करण्याची प्रेरणा देतो. अस्सल दर्जाची वैचारिकता आंबेडकरवादी कवितेतून प्रत्ययाला येताना दिसते. मराठी कवितेत आमुलाग्र बदल घडून आणण्याचे महत्वपूर्ण कार्य आंबेडकरवादी कवितेने केले आहे.

## निष्कर्ष :

1) आंबेडकरवादी कवितेतून व्यक्त होणारी वैचारिकता ही संपूर्ण मानवी समाजाच्या उन्नतीचा विश्वव्यापी विचार मांडते.
2) आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊनन ही कविता शब्दरूप घेते.
3) अन्याय, अत्याचाराला ही कविता वाचा फोडणारी आहे.
4) स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा पुरस्कार करणारी कविता आहे.
5) आंबेडकरी कवितेतील वैचारिकता ही सामाजिक बांधिलकी मानणारी आहे.
6) वास्तव जीवनानुभूतीचा उत्कट प्रत्येय देणारी कविता आहे.
7) विद्रोह, नकार, चीड व्यक्त करणारी कविता आहे.
8) नवीन क्रांतीदर्शी, क्रांती विज्ञानाची कास धरणारी ही कविता.
9) नवयुगाचे, माणूसकीचे गाणे गाणारी ही कविता आहे.

## संदर्भ ग्रंथ :

1) नामदेव ढसाळ, 'गोलपीठा' नील कंठ प्रकाशन,पुणे प्र.आ.1975
2) फडके भालचंद्र, 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन,पुणे द्वि.आ.1981.
3) त्र्यंबक सपकाळे, 'सुरूंग', 'अस्मितादर्शन' प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.1976.
4) पवार ज.वि., 'नाकेबंदी' मुक्तछंद प्रकाशन, मुंबई प्र.आ.1976.
5) अर्जून डांगळे, 'छावणी हलते आहे', कर्मवीर प्रकाशन, मुंबई प्र.आ.2001.
6) यशवंत मनोहर, 'उत्थान गुंफा', कॉन्टिनेंटल प्रकाशन,पुणे द्वि.आ.2001 प्र.क.83
7) डॉ.सुनिल चंदनशिवे, 'मराठी दलित कविता एक चिकित्सक अभ्यास', डिंपल पब्लिकेशन प्र.आ.पृ. क्र.222, मुंबई.
8) दया पवार, 'कोंडवाडा' अनिल मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे प्र.आ.1984.
9) प्रल्हाद चेंदवणकर, 'ऑडिट' अभिनव प्रकाशन मुंबई प्र.आ.1976.
10) नरेंद्र बी.नरवाडे, 'लखात एक' दै.वृत्तरत्न सम्राट दि. 7 ऑक्टोबर 2005.
11) प्रकाश महादेव पाखरे, 'भीम कैवारी', दैनिक वृत्तरत्न सम्राट दि. 7 जानेवारी 2006.